मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेच्या वतीने मोफत रोजगार मेळाव्याचे आयोजन

## पिंपरी चिंचवड ऑटो क्लस्टर येथे 28 नोव्हेंबर 2025 रोजी मोफत भव्य रोजगार मेळावा

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिका, समाज विकास विभाग, लाईट हाऊस कम्युनिटीज फाउंडेशन आणि इक्विटास डेव्हलपमेंट इनिशिएटिव्हज ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी चिंचवड ऑटो क्लस्टर येथे मोफत भव्य रोजगार मेळावा दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात शहरातील विविध औद्योगिक कंपन्या सहभागी होणार असून युवक-युवतींना एकाच ठिकाणी विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. तरी जास्तीत जास्त युवक-युवतींनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.




रोजगार मेळाव्यात रिटेल, लॉजिस्टिक्स, ऑटोमोटिव्ह, कन्स्ट्रक्शन, एज्युकेशन अँड ट्रेनिंग, मिडिया अँड एंटरटेनमेंट, इलेक्ट्रॉनिक्स अँड हार्डवेअर, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (ITES), हेल्थकेअर आणि फार्मास्युटिकल्स आदी क्षेत्रांतील विविध पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. १८ ते ३५ वयोगटातील पात्र उमेदवारांसाठी ही उत्कृष्ट संधी असून उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी करून आवश्यक कागदपत्रांसह मेळाव्यात उपस्थित राहावे. हा मेळावा शुक्रवार, २८ नोव्हेंबर २०२५, सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत ऑटो क्लस्टर, चिखली येथे पार पडणार आहे. मेळाव्यात सहभागी होताना उमेदवारांनी आधार कार्ड, पॅन कार्ड, गुणपत्रिका आणि दोन पासपोर्ट आकाराचे फोटो सोबत ठेवावेत, अशी माहिती महापालिकेच्या समाज विकास विभागातून देण्यात आली.

> पिंपरी चिंचवड महापालिका युवकांना रोजगारक्षम बनवण्यासाठी कौशल्याधारित प्रशिक्षण, उद्योगसंवाद आणि संधी उपलब्ध करून देण्यावर सतत भर देत आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारीतून राबविले जाणारे रोजगार मेळावे हे शहरातील तरुणांसाठी रोजगाराकडे जाणारा विश्वासार्ह आणि सुलभ मार्ग ठरतात. स्थानिक उद्योगांच्या गरजा आणि तरुणांच्या कौशल्यांचा मेळ घालून सर्वांगीण औद्योगिक प्रगती साधणे हे महापालिकेचे ध्येय आहे.
>
> **– तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

> पिंपरी चिंचवड शहराला औद्योगिक शहर म्हणून ओळख मिळाली असून येथे कौशल्याधारित रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. प्रशासन, औद्योगिक क्षेत्र आणि युवक यांच्यातील प्रभावी समन्वय वाढला, तर रोजगारनिर्मितीची गती आणखी वाढेल. महापालिकेचा उद्देश तरुणांना केवळ नोकरी मिळवून देणे नसून त्यांना सक्षम, कौशल्यपूर्ण आणि रोजगारक्षम बनवणे हा आहे. हा रोजगार मेळावा त्याच दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे.
>
> **– ममता शिंदे, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# वाकडमध्ये तीन दिवसीय श्रीकृष्ण कथासोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न!

## भव्य सोहळ्याला वाकड–ताथवडे- पुनावळे परिसरातून हजारो भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनीधी**

वाकड येथे राम हनुमंत वाकडकर आयोजित तीन दिवसीय श्रीकृष्णलीला (मायरा कथा) सोहळ्याचा काल भक्तिमय वातावरणात यशस्वी समारोप झाला. तीन दिवसांपासून सुरू असलेल्या या भव्य सोहळ्याला वाकड-ताथवडे- पुनावळे परिसरातून हजारो भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. परिसरात अखंड नामस्मरण, अध्यात्मिक वातावरण आणि भक्तिरसाने न्हाऊन निघालेली उपस्थिती पाहता संपूर्ण वातावरण पवित्रतेने दुमदुमले होते.

पहिल्या दिवशी झालेल्या उद्घाटनापासूनच भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. जया किशोरी यांच्या अमृतमय आणि हृदयस्पर्शी निरूपणाने तीनही दिवस भाविक मंत्रमुग्ध झाले. सोहळ्यादरम्यान महिलावर्ग, तरुण, तसेच कुटुंबांसह वयोवृद्धांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. परिसरातील विविध सामाजिक मंडळी आणि मान्यवरांनीही उपस्थित राहून सोहळ्यास अधिक रंगत आणली.

मुख्य आयोजक राम हनुमंत वाकडकर यांनी सांगितले की, "वाकड-ताथवडे- पुनावळे परिसरात आजवर केलेल्या सामाजिक आणि सेवाभावी कामाची पावती नागरिकांनी दिलेल्या या प्रचंड प्रतिसादातून दिसून आली. तीन दिवसांच्या या सोहळ्यात भाविकांनी दाखवलेला सहभाग अविस्मरणीय आहे."




तीन दिवस चाललेल्या या कथा सोहळ्याने वाकड-ताथवडे- पुनावळे परिसराच्या अध्यात्मिक संस्कृतीत एक विशेष अध्याय जोडला असून, भाविकांच्या मोठ्या गर्दीमुळे हा कार्यक्रम वर्षानुवर्षे स्मरणात राहील, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

यावेळी खासदार- श्रीरंग (आप्पा) बारणे, आमदार शंकरभाऊ जगताप, आमदार अमितजी गोरखे, आमदार उमाताई खापरे, आमदार श्रीकांत भारती, आमदार उमाताई खापरे, आमदार श्रीकांत भारती, खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या मातोश्री, रुक्मीणी मोहोळ, माजी आमदार – अश्विनी ताई जगताप, भा.ज.पा. शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, जेष्ठ नेते नाना काटे, नगरसेवक विनायक दादा गायकवाड, नगरसेवक भाऊसाहेब भोईर, नगरसेवक संदीप कस्पटे, नगरसेविका आरतीताई चोंधे, नगरसेविका सुनिता तापकीर, नगरसेवक चंद्रकांत नखाते, नगरसेविका सविता खुळे, नगरसेवक शेखर चिंचवडे, नगरसेवक प्रशांत शितोळे, नगरसेवक विलास मेडगिरी, माजी महापौर नितिन आप्पा काळजे, नगरसेविका ममता गायकवाड, नगरसेविका अश्विनी वाघमारे, ह.भ.प लहु महाराज जमदाडे ह.भ.प शेखर जांभुळकर, ह.भ.प. महादेव महाराज भुजबळ, A.C.P. सुनिल कुऱ्हाडे साहेब, हिंजवडी पोलिस वरिष्ठ पोलीस निरिक्षक बालाजी पांढरे साहेब, उपमहाराष्ट्र केसरी, विशाल आप्पा कलाटे, युवा नेते संदीप पवार, युवा नेते चेतन भुजबळ, गणेश कस्पटे, संतोष पवार, पवार, विजय दर्शिले राजाभाऊ भुजबळ, मोहनदादा भुमकर, भारती विनोदे, रणजित कलाटे, विशाल वाकडकर, धनाजी मामा विनोदे, कुणाल वाकडकर, विक्रम वाघमारे, अंकुश कलाटे, सोमनाथ कलाटे, प्रकाश जमदाडे, अंकुश भुजबळ, तेजस्वीनी ढोमसे, विक्रम विनोदे , अमर भूमकर, योगेश बाबर, रुपेश कलाटे, संजय भुजबळ, विश्वजित बारणे, अमित दर्शिले, विनोद कलाटे, तुषार देवकर, सागर भुमकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# 'नमामी इंद्रायणी' प्रकल्पासाठी निविदा प्रसिद्ध!

## महानगरपालिका प्रशासनाकडून प्रकल्पाला गती; आमदार महेश लांडगे यांचा "ड्रीम प्रोजेक्ट" दृष्टीक्षेपात

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडकरांसह तमाम वारकरी सांप्रदायामध्ये श्रद्धेचे स्थान असलेली इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला चालना मिळाली असून, महानगरपालिका प्रशासनाने निविदा प्रसिद्ध केली आहे.

भाजपा आमदार महेश लांडगे यांनी 'व्हीजन-2020' या अभियानामध्ये 'नमामी इंद्रायणी' प्रकल्पाची घोषणा केली होती. त्यानंतर 2019 व 2024 च्या विधानसभा निवडणुकीत हा मुद्दा चर्चेत राहिला. राज्य शासनाची पर्यावरण समिती आणि राज्य स्तरीय तांत्रिक समितीच्या मान्यतेसाठी हा प्रकल्प प्रलंबित होता.



दरम्यान, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पर्यावरण समितीची मान्यता घेण्यासाठी सकारात्मक सहकार्य केले. त्यानंतर विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य स्तरीय तांत्रिक समितीची मान्यता देण्यासाठी सर्वोतोपरी निर्णय घेतला. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने आता निविदा प्रक्रिया राबवण्यासाठी आवश्यक असलेल्या 'इस्टिमेंट कमिटी'समोर हा विषय ठेवला होता. त्याला मान्यता देण्यात आली. त्यानंतर आता निविदा प्रसिद्ध केली आहे. पहिल्या टप्प्यात 526 कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

**पर्यावरण प्रेमींच्या सूचनांचा अंतर्भाव...**

शहर आणि परिसरातील पर्यावरण प्रेमी संस्था, संघटनांच्या प्रतिनिधींनी नदी सुधार प्रकल्पाचा विकास आराखडा अंतिम करताना महानगरपालिकेच्या MASTER PLAN मध्ये दर्शवल्यानुसार विविध ठिकाणी 60 एमएलडी क्षमतेचे मैलाशुद्धीकरण केंद्र सदर कामामध्ये प्रस्तावित केले आहे. तसेच, WATER ATM, PUBLIC TOILET, STREET FURNITURE, CHAIN LINK FENCING COMPOUND WALL आणि बायोडायव्हर्सिटी पार्क इत्यादी कामांचा समावेश करण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या अमृत- 2 उपक्रमांतर्गत या प्रकल्पाचे काम होणार आहे.

> " इंद्रायणी नदी केवळ धार्मिक श्रद्धेचा विषय नाही, तर आपली संस्कृती, पर्यावरण आणि शहराच्या आरोग्याशी थेट जोडलेली जीवनवाहिनी आहे. नदी सुधार प्रकल्पाची निविदा प्रसिद्ध झाली. ही प्रक्रिया पूर्ण करून डिसेंबर- 2025 पासून या प्रकल्पाचे काम सुरू होईल, असा विश्वास आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महायुती सरकारचे यासाठी आभार व्यक्त करतो. या प्रकल्पाद्वारे इंद्रायणी नदीला नवजीवन मिळेल, प्रदूषणमुक्त व सुरक्षित किनारे तयार होतील, तसेच नागरिकांना हरित व सुंदर नदीकाठाचा अनुभव मिळेल. आम्ही हा प्रकल्प वेळेत व गुणवत्तेने पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहोत.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# संरक्षण दलाच्या जवानांचा अग्निशमनच्या सरावात सहभाग

## संरक्षण दलाच्या जवानांची महापालिकेच्या संत तुकाराम नगर येथील मुख्य अग्निशमन केंद्राला भेट

**पिंपरी | प्रतिनिधी**

देहूरोड कँटॉन्मेंट बोर्ड येथील संरक्षण दलाच्या जवानांनी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या संत तुकाराम नगर येथील मुख्य अग्निशमन केंद्राला नुकतीच भेट दिली. ही भेट देण्यामागे अग्निशमन विभागाचे कामकाज जाणून घेणे, अग्निशमन विभागाच्या गाड्या तसेच इतर संसाधनांची माहिती घेणे आणि अग्निशमन विभागाच्या जवानांसोबत सराव करणे हा मुख्य उद्देश होता.




अग्निशमन विभाग कशाप्रकारे काम करतं हे जवळून जाणून घेण्यासाठी संरक्षण दलाचे ६० जवान उपस्थित होते. अग्निशमन विभागातर्फे वरिष्ठ अधिकारी गौतम इंगवले यांनी उपस्थित जवानांना विभागाच्या कामकाजाची माहिती दिली. यासोबतच मॉक ड्रिलचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते. आगीचे प्रकार, त्वरित रिस्पॉन्स, रेस्क्यू अशा गोष्टींचे प्रशिक्षण यावेळी जवानांनी घेतले.

अग्निशमन विभागाकडे असलेल्या संसाधनांची माहिती सुद्धा जवानांना देण्यात आली. विभागातील गाड्या कशा पद्धतीने कार्य करतात, त्यांच्या उपयोग कशा प्रकारे केला जातो, त्याच प्रमाणे फायर सूट, होज रील पाइप अशा इतर साधनांची ही ओळख जवानांना करून देण्यात आली. संरक्षण दलाच्या देहूरोड संस्थांनामार्फत या कमांड फायर फायटिंग कोर्सचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अनेक अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

> " अग्निशमन विभागाचे जवान आणि भारतीय सैन्याचे जवान हे अनेक संकटांना सामोरे जातात. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी हे जवान नेहमीच सिद्ध असतात. अतिशय उत्साही वातावरणात हे प्रशिक्षण सत्र पार पडले. जवानांनी अतिशय काळजीपूर्वक सर्व माहिती जाणून घेतली. अशा पद्धतीचे प्रशिक्षण सत्र वारंवार होत रहावेत, यासाठी आम्ही अधिक प्रयत्न करू.
>
> **- ऋषिकांत चिपाडे, अग्निशमन अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका.**

> " देशाच्या रक्षणासाठी सैन्य आणि अग्निशमन विभागाचे जवान नेहमीच कार्यरत असतात. सैन्य देशाच्या शत्रूला रोखते आणि अग्निशमन विभाग आपत्कालीन परिस्थिती सांभाळते. अग्निशमन विभागाच्या कार्याचे स्वरूप, त्याचे महत्व जाणून घेण्यासाठी जवानांनी विभागाला दिलेली भेट अतिशय महत्वाची आहे. दोन्ही विभागांची कार्यप्रणाली वेगवेगळी असली तरी देशसेवेचा उद्देश मात्र एकच आहे.
>
> **- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

> " अग्निशमन विभागची कार्यपद्धतीने जाणून घेण्यासाठी आणि प्रशिक्षण घेण्यासाठी संरक्षण दलाच्या जवानांनी अग्निशमन विभागाला दिलेली ही प्रत्यक्ष भेट महत्वपूर्ण आहे. जवानांना कोणत्याही क्षणी आपत्कालीन परिस्थितीचा सामना करावा लागू शकतो, अग्निशमन विभागासोबत त्यांनी घेतलेले प्रशिक्षण हे त्यांच्यासाठी नक्कीच उपयुक्त ठरेल.
>
> **- व्यंकटेश दुर्वास, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# खराडी ते खडकवासला अन् नळस्टॉप ते माणिकबाग मेट्रो धावणार, केंद्राची मंजूरी

## पुण्याच्या सार्वजनिक वाहतूक नेटवर्कला आणखी एक मोठी चालना मिळणार आहे, या बैठकीत पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाला मंजूरी मिळाली.

**पुणे | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ समितीची बैठक झाली. बैठकीत दुर्मिळ पृथ्वी स्थायी चुंबक निर्मिती, पुणे मेट्रोचा विस्तार, देवभूमी द्वारका (ओखा)-कनालस रेल्वे मार्गाचे दुपदरीकरण आणि तिसऱ्या आणि चौथ्या बदलापूर-कर्जत रेल्वे मार्गांबाबत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने ७,२८० कोटी रुपयांच्या योजनेला मान्यता दिली आहे.

माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं की, या प्रकारच्या पहिल्याच उपक्रमाचे उद्दिष्ट भारतात ६,००० मेट्रिक टन प्रतिवर्ष एका त्मिक दुर्मिळ पृथ्वी स्थायी चुंबक) उत्पादन सुविधा स्थापन करणं आहे. यामुळे स्वावलंबीता वाढेल आणि जागतिक बाजारपेठेत भारताला एक महत्त्वाचा देश म्हणून स्थान मिळेल. या योजनेचा एकूण खर्च ₹७२८० कोटी आहे. यामध्ये पाच (५) वर्षांसाठी REPM विक्रीवर ₹६४५० कोटींचे विक्री-संबंधित प्रोत्साहन आणि एकूण ६००० MTPA REPM उत्पादन सुविधा स्थापन करण्यासाठी ₹७५० कोटींचे भांडवली अनुदान समाविष्ट आहे.




### पुण्यातील मेट्रो प्रकल्प कोणामार्फत राबवला जाईल?

» हा प्रकल्प महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महाराष्ट्र मेट्रो) मार्फत राबवला जाईल, जे सर्व सिव्हिल, इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल आणि सिस्टीमचे काम करेल. टोपोग्राफिकल सर्व्हे आणि तपशीलवार डिझाइन सल्लागार यांसारखी प्री-कॉन्स्ट्रक्शन कामे आधीपासूनच सुरू आहेत.या नवीन मंजुरीमुळे पुणे मेट्रोचे जाळे १०० किलोमीटरचा टप्पा ओलांडणार आहे.

पुण्याच्या सार्वजनिक वाहतूक नेटवर्कला आणखी एक मोठी चालना मिळणार आहे. या बैठकीत पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील लाईन ४ (खर्डी-हडपसर-स्वारगेट-खडकवासला) आणि दुसऱ्या टप्प्यातील लाईन ४अ (नल स्टॉप-वारजे-माणिक बाग) यांना मंजुरी देण्यात आली आहे. दुसऱ्या टप्प्यातील लाईन २अ (वनाज-चांदणी चौक) आणि दुसऱ्या टप्प्यातील लाईन २ब (रामवाडी-वाघोली/विठ्ठलवाडी) यांच्या मंजुरीनंतर हा दुसरा मोठा प्रकल्प आहे.

एकूण ३१,६३६ किमी लांबीच्या या प्रकल्पात २८ उन्नत स्थानके असतील. लाईन्स ४ आणि ४अ पूर्व, दक्षिण आणि पश्चिम पुण्यातील आयटी हब, व्यावसायिक क्षेत्रे, शैक्षणिक संस्था आणि निवासी क्लस्टरना जोडतील. पाच वर्षांत पूर्ण होण्याची अपेक्षा असलेल्या या प्रकल्पासाठी अंदाजे ९,८५७.८५ कोटी रुपये खर्च येईल आणि भारत सरकार, महाराष्ट्र सरकार आणि बाह्य द्विपक्षीय/बहुपक्षीय निधी संस्था संयुक्तपणे निधी देतील.

### 31 किमी लांब, 28 उन्नत स्थानक

»केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिलेल्या प्रकल्पामुळे पुण्याचा पूर्व, पश्चिम आणि दक्षिण भाग एकमेकांशी जोडला जाणार आहे. या प्रकल्पाची लांबी एकूण 31.63 किमी असेल. या मार्गावर २८ उन्नत स्थानके असतील. हा प्रकल्प पाच वर्षांत पूर्ण होणार असून त्याचा अंदाजित खर्च ९,८५७.८५ कोटी रुपये इतका आहे.हा खर्च भारत सरकार, महाराष्ट्र सरकार आणि बाह्य द्विपक्षीय/बहुपक्षीय निधी संस्थांच्या मदतीने केला जाईल.

### पुण्यातील वाहतूक कोंडी कमी होणार

» हडपसर रेल्वे स्थानकावर इंटरचेंज सुविधा उपलब्ध होईल आणि भविष्यात लोणी काळभोर व सासवड रोडकडे जाणाऱ्या कॉरिडॉरशीही जोडल्या जातील, ज्यामुळे मेट्रो, रेल्वे आणि बस यांच्यातील मल्टीमोडल कनेक्टिव्हिटी मजबूत होईल. खराडी आयटी पार्कपासून खडकवसल्याच्या निसर्गरम्य पट्ट्यापर्यंत, हडपसरच्या औद्योगिक हबपासून वारजेतील निवासी संकुलांपर्यंत, लाइन ४ आणि ४ए विविध भागांना एकत्र जोडतील.सोलापूर रोड, मगरपट्टा रोड, सिंहगड रोड, कारवे रोड आणि मुंबई–बेंगळुरू महामार्ग या पुण्यातील सर्वात व्यग्र मार्गांवरून जाणाऱ्या या प्रकल्पामुळे वाहतूक कोंडी कमी होईल.

या मार्गिका पुण्याच्या कॉम्प्रिहेन्सिव्ह मोबिलिटी प्लॅन (सीएमपी) चा एक आवश्यक भाग आहेत आणि खराडी बायपास आणि नल स्टॉप (लाइन २) आणि स्वारगेट (लाइन १) येथील कार्यरत आणि मंजूर कॉरिडॉरशी अखंडपणे जोडल्या जातील. दरम्यान, महाराष्ट्र आणि गुजरात राज्यातील चार जिल्ह्यांचा समावेश असलेले हे दोन प्रकल्प भारतीय रेल्वेचे विद्यमान जाळे अंदाजे २२४ किमीने वाढवतील. मंजूर झालेल्या मल्टी-ट्रॅकिंग प्रकल्पामुळे अंदाजे ३२ लाख लोकसंख्या असलेल्या सुमारे ५८५ गावांना जोडणार आहे.

# ‘संविधान सन्मान रॅली’ ने वेधले पुणेकरांचे लक्ष...

## संविधानाच्या रक्षणासाठी बहुजन समाज पक्ष वचनबद्ध आहे – डॉ. हुलगेश चलवादी

**पुणे | प्रतिनिधी**

विश्वरत्न,महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तळागाळातील नागरिकांना विश्वातील सर्वात प्रगल्भ, सर्वसमावेशक असे संविधान देऊन जगण्याचा अधिकार दिला. सर्वसामान्यांचा आवाज असलेल्या संविधानाच्या रक्षणासाठी बहुजन समाज पक्ष वचनबद्ध आहे, असे प्रतिपादन पक्षाचे प्रदेश महासचिव, पश्चिम महाराष्ट्र झोन मुख्य प्रभारी डॉ.हुलगेश चलवादी यांनी केले.

संविधान दिनाचे औचित्य साधून बसपा च्या वतीने ‘संविधान सन्मान रॅली’ काढण्यात आली. याप्रसंगी डॉ.चलवादी बोलत होते. पुणे महानगर पालिका आवारात असलेल्या हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, जाणताराजा छत्रपती शिवाजी महाराज आणि क्रांतिसूर्य महात्मा ज्योतीराव फुले यांच्या स्मारकाला माल्यार्पण करीत संविधानाच्या प्रास्ताविकाचे सामूहिक वाचन करीत रॅली ची सुरुवात करण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात संविधानाचे प्रास्ताविक ‘संविधान रथात’ ठेऊन महानगरपालिका ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या पर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली

‘संविधान सन्मान रॅली’त अशोकदादा गायकवाड (पुणे जिल्हाध्यक्ष),बाप्पुसाहेब कुदळे (उपाध्यक्ष, पुणे जिल्हा), प्रविण वाकोडे (महासचिव), पुणे जिल्हा प्रभारी अनिल त्रिपाठी, विजय बेद ,अरुण गायकवाड, परशुराम आरूणे, सागर जगताप, राम डावकर, गणेश खंदारे, धम्मदीप लगाडे, प्रभाकर खरात, बंशी रोकडे, पुणे जिल्हा सदस्य पी.आर गायकवाड, विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष राजेंद्र राऊत (हडपसर), मनोज कसबे (वडगावशेरी), रत्नदीप जावळे (भोसरी), शिवाजी वाघमारे (उपाध्यक्ष, वडगावशेरी) प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वसामान्यांचा आवाज असलेल्या संविधानाच्या रक्षणासाठी बहुजन समाज पक्ष वचनबद्ध आहे, असे प्रतिपादन पक्षाचे प्रदेश महासचिव, पश्चिम महाराष्ट्र झोन मुख्य प्रभारी डॉ.हुलगेश चलवादी यांनी केले.





### संविधानाची प्रत भेट

» संविधान सन्मान रॅली पुणे स्टेशन स्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाजवळ पोहोचली. दरम्यान संविधान रथाने समस्त पुणेकरांचे लक्ष वेधले. डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करीत, मुंबई येथे २६/११ च्या दहशत वादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेले पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करीत राष्ट्रागीताने रॅली ची सांगता झाली.तत्पूर्वी पुणे जिल्हाधिकाऱ्यांना संविधानाची प्रत भेट बसपा पदाधिकाऱ्यांनी दिली.

# समस्यांवर उपाययोजनेसाठी मविआची हमी

## महाविकास आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार अभिजित मधुकर जगताप यांची ग्वाही

**पुणे | प्रतिनिधी**

सासवड नगरपालिकेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध प्रभागांमध्ये सत्ताधारी व्यवस्थेविषयी प्रचंड नाराजी दिसून आली. नागरिकांनी व्यक्त केलेल्या तक्रारींमध्ये अतिक्रमण, अविकसित भूखंड, पायाभूत सुविधांतील तुटवडा, नगरपालिकेच्या कामकाजातील बेफिकिरी यांचा ठळक उल्लेख होता. असे महाविकास आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार अभिजित मधुकर जगताप यांनी सांगितले.

समस्यांवर उपाययोजनेसाठी मविआची हमी आहे, अशी ग्वाही जगताप यांनी यावेळी दिली. विविध ठिकाणच्या अतिक्रमित दफनभूमीच्या जागा, आरक्षित भूखंडांचा चुकीचा वापर, अनेक वर्षे अविकसित पडून असलेली जमीन यामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. शेतमाल विक्रीसाठी येणाऱ्या शेतकरी व व्यापाऱ्यांकडून घेतली जाणारी भरमसाठ पावती, शहरभर पसरलेले खड्डेमय रस्ते, नदीला थेट जोडलेल्या सांडपाणी गटारांमुळे निर्माण झालेली अस्वच्छता, दुर्गंधी हे दैनंदिन जीवनातील गंभीर प्रश्न असल्याचे नागरिकांनी सांगितले.

त्याच त्या ठेकेदारांकडे वर्षानुवर्षे देण्यात येणारे ठेके, त्यांचा वाढलेला हस्तक्षेप आणि नगरपालिकेच्या कारभारात निर्माण झालेली एकाधिकारशाही याबद्दलही प्रचंड नाराजी व्यक्त झाली. अनेक प्रभागांमध्ये शेवटच्या घरापर्यंत स्ट्रीट लाईटचा अभाव, विकासकामांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष किंवा चालढकल केल्याचे आरोप नागरिकांनी खुलेपणाने मांडले. निवडून आल्यानंतर जनतेच्या समस्या ऐकण्यासाठी वेळ न देणे हे सध्याच्या सत्ताधाऱ्यांचे मोठे अपयश असल्याचे जगताप यांनीही अधोरेखित केले.

शहरातील रस्त्यांची कामे मोठ्या प्रमाणात ठप्प असून जी कामे झाली ती निकृष्ट दर्जाची आहे. नागरी सुविधांची बिकट अवस्था ही सासवडकर जनतेसाठी गंभीर बाब असून सर्व समस्यांचा नेमका आढावा घेत आम्ही त्यावर ठोस उपाययोजना करणार असल्याचे जगताप यांनी स्पष्ट केले.

नागरिकांनी व्यक्त केलेल्या तक्रारींमध्ये अतिक्रमण, अविकसित भूखंड, पायाभूत सुविधांतील तुटवडा, नगरपालिकेच्या कामकाजातील बेफिकिरी यांचा ठळक उल्लेख होता. असे महाविकास आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार अभिजित मधुकर जगताप यांनी सांगितले.




### लवकरच विकासनामा जाहीर करणार

» प्रचारसभेत बोलताना अभिजित मधुकर जगताप म्हणाले की, सासवड शहरासाठी लवकरच महाविकास आघाडीतर्फे विकासनामा जाहीर केला जाणार असून त्यातील बहुतेक महत्त्वाची कामे वर्षपूर्तीपूर्वी पूर्ण करण्यात येतील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. अनागोंदी व्यवस्थेविरोधात सक्षम पर्याय म्हणून आम्ही जनतेसमोर उभे आहोत. त्यामुळे सासवडकरांनी मशालीच्या चिन्हावर विश्वास ठेवून आम्हाला साथ द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

### ठोस उपाययोजना करणार

» शहरातील रस्त्यांची कामे मोठ्या प्रमाणात ठप्प असून जी कामे झाली ती निकृष्ट दर्जाची आहे. नागरी सुविधांची बिकट अवस्था ही सासवडकर जनतेसाठी गंभीर बाब असून सर्व समस्यांचा नेमका आढावा घेत आम्ही त्यावर ठोस उपाययोजना करणार असल्याचे जगताप यांनी स्पष्ट केले.

### सत्ताधाऱ्यांचे मोठे अपयश

» ठेकेदारांकडे वर्षानुवर्षे देण्यात येणारे ठेके, त्यांचा वाढलेला हस्तक्षेप आणि नगरपालिकेच्या कारभारात निर्माण झालेली एकाधिकारशाही याबद्दलही प्रचंड नाराजी व्यक्त झाली. अनेक प्रभागांमध्ये शेवटच्या घरापर्यंत स्ट्रीट लाईटचा अभाव, विकासकामांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष किंवा चालढकल केल्याचे आरोप नागरिकांनी खुलेपणाने मांडले. निवडून आल्यानंतर जनतेच्या समस्या ऐकण्यासाठी वेळ न देणे हे सध्याच्या सत्ताधाऱ्यांचे मोठे अपयश असल्याचे जगताप यांनीही अधोरेखित केले.

# मुलाला घेऊन पळणाऱ्या बिबट्यामागे आई धावली; 'त्या' एका क्षणाने फिरवले मृत्यूचे चक्र

## खेड तालुक्यातील श्री क्षेत्र निमगाव खंडोबा परिसरात पाच वर्षीय देवांश गव्हाणे या चिमुकल्यावर बिबट्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली

**पुणे | प्रतिनिधी**

अचानक झालेल्या हल्ल्यात बिबट्याने पाच वर्षीय देवांश गव्हाणे याला पकडले होते; मात्र मुलाच्या आर्त किंकाळ्या ऐकताच आई अश्विनी गव्हाणे हिने अक्षरशः 'वाघिणीचे रूप' धारण करत बिबट्याच्या मागे धाव घेतली. आईच्या या धाडसी प्रतिहल्ल्याने घाबरून बिबट्याने चिमुकल्याला सोडून पळ काढला. तत्पश्चात गावकऱ्यांच्या मदतीने या चिमुकल्याला उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले.

खेड तालुक्यातील श्री क्षेत्र निमगाव खंडोबा परिसरात पाच वर्षीय देवांश गव्हाणे या चिमुकल्यावर बिबट्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली असून संपूर्ण घाटवस्ती परिसरात पुन्हा भीतीचं सावट दाटलं आहे. देवांश गव्हाणे हा आपल्या घराजवळ दरवाजात खेळत असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक झडप घालत हल्ला केला. या हल्ल्यात त्याच्या शरीरावर खोल ओरखडे व चावा लागून तो गंभीर जखमी झाला.

तातडीने चांडोली ग्रामीण रुग्णालयात त्याला दाखल करण्यात आले असून डॉक्टरांनी त्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले.अचानक झालेल्या हल्ल्यादरम्यान बिबट्याने देवांशला पकडले होते; मात्र मुलाच्या आर्त किंकाळ्या ऐकून आई अश्विनी गव्हाणे हिने अक्षरशः 'वाघिणीचे रूप' धारण करत बिबट्याच्या मागे धाव घेतली. आईच्या या धाडसी प्रतिहल्ल्यामुळे बिबट्याने मुलाला सोडून पळ काढला.

तत्पश्चात गावकऱ्यांच्या मदतीने देवांशला रुग्णालयात नेण्यात आले. अवघ्या तीन दिवसांत दोन चिमुकल्यांवर हल्ले झाल्याने निमगाव परिसरात प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या पंधरा दिवसांत निमगाव व रेटवडीत बिबट्याच्या तीन हल्ल्यांच्या घटना घडल्या असून नागरिकांत तीव्र असंतोष आहे. रात्रीच्या वेळी शेतात किंवा रस्त्यावर जाण्याबाबत नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

चांडोली रुग्णालयातील डॉक्टरांनी देवांशवर तातडीने उपचार सुरू केले असून आवश्यक तपासण्यांनंतर त्याची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे स्पष्ट केले. देवांशच्या आईने दाखवलेले धाडस ही संपूर्ण परिसरासाठी प्रेरणादायी बाब असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.



### कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची मागणी

» दरम्यान, ग्रामस्थांनी वनविभागाकडे परिसरात पिंजरे लावणे, ट्रॅप कॅमेरे बसवणे आणि रात्री गस्त वाढवणे याबाबत मागणी केली आहे. मात्र वारंवार होणाऱ्या हल्ल्यामुळे वनविभागाच्या उपाययोजना अपुऱ्या असल्याची ग्रामस्थांची टीका असून बिबट्याचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची जोरदार मागणी होत आहे.